# याज्ञसेनी

डॉ. सुमति क्षेत्रमाडे

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

A34

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**याज्ञसेनी : डॉ. सुमति क्षेत्रमाडे**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ ४००/-

# याज्ञसेनी

# थोडं प्रास्ताविक...

परवा मुंबईला गेले असता माझी एक मैत्रीण भेटली. तिने म्हटले,

''तुझ्या 'सत्यप्रिय गांधारी'बद्दल तुला मन:पूर्वक धन्यवाद! गांधारीच्या मुखातून अगदी संपूर्ण महाभारत किती आटोपशीरपणे सांगितलेस! खूपच आवडली. आमच्या घरी तो एक आता कायमचा ग्रंथ झाला आहे. कुणाचं ना कुणाचं नित्य वाचन चालू आहे. शेजारीपाजारी फिरतो आहे.''

''मग माझ्या लिहिण्याचं-घेतलेल्या श्रमाचं चीज झालं म्हणायला हरकत नाही.''

''निश्चितच! आता त्या प्रचंड महाभारतातून तू एकदाची मोकळी झालीस.''

मी हसून मध्येच म्हटलं, ''छे गं! उलट त्यात अधिक गुंतून पडलेय. त्यातून मी आता इतक्यात बाहेर पडेन असं वाटत नाही अन् खरं तर त्यातून बाहेर पडावं असंही वाटत नाही.''

''म्हणजे गं?''

''अगं, महाभारत म्हणजे एक प्रशांत महासागर! आपण त्यातलं काही लिहितो म्हणजे त्या महासागरातून एक शिंपलीभर पाणी घेतो.''

''म्हणजे तू अजूनही त्यातलं काही लिहिणार आहेस का?''

''हो. लिहून झाली आहे. छपाईला गेली आहे.''

''कादंबरी?''

''हो. याज्ञसेनी-द्रौपदी.''

''अगं, तुझं हे लेखन! अन् मग तुझा दवाखाना? प्रॅक्टिस?''

''ते सगळं नित्याप्रमाणे चालू आहेच.''

गांधारी, कुंती आणि याज्ञसेनी-द्रौपदी या महाभारतातल्या अथपासून इतिपर्यंत महत्त्वाच्या राजस्त्रिया.

तिघींचे व्यक्तिमत्त्व अलौकिक, पण त्यांचे आदर्श आणि जीवनाचे उद्देश हे अगदी भिन्न होते. पण त्यातही कुंती आणि याज्ञसेनी समविचारी, समान ध्येयाच्या.

गांधारी-'सत्य हाच धर्म। सत्य हेच परब्रह्म।' आयुष्यभर तिने सत्याचा पाठपुरावा केला.

आपला पती धृतराष्ट्र-अंध पती, दुर्योधनासह शंभर पुत्र, या सर्वांना ती सतत सत्याचा उपदेश करीत होती. सत्याचे महत्त्व नाना तऱ्हांनी त्यांना पटवून देण्याचा सतत प्रयत्न करीत होती.

''दुर्योधना, अरे, सत्य तिथे जय! तुला विजयी व्हायचं असेल तर सत्याने वाग. असत्याच्या पाठी पराजय-अंती सर्वनाश अटळ असतो.''

पण त्याने ऐकलं नाही. अंती भयानक युद्ध झालं. सर्वनाश तिने पाहिला. अशी ही दुर्दैवी स्त्री!

०००

कुंती - पाच पांडवांची माता. प्रखर क्षात्रतेजाने झळकणारी. आपल्या पुत्रांचा-पांडवांचा क्षात्रधर्म सतत जागृत ठेवणे, प्रसंगी प्रज्वलित करणे, त्याशिवाय त्यांची-त्या भ्रात्यांची एकजूट कायम राखणे, त्यांच्यात फूट पडणार नाही अशी दक्षता घेणे हे तिचे जीवितकार्य होते.

०००

याज्ञसेनी-द्रौपदी यज्ञकुंडाच्या ज्वालांतून निर्माण झालेली-प्रकट झालेली.

अत्यंत तेजस्वी, प्रगाढ बुद्धिमान होती.

तसं पाहिलं तर त्याच यज्ञातून तिच्या आधी प्रथम निर्माण झालेला धृष्टद्युम्न तिचा भाऊ, हा स्वभावाने ऋजु आणि सौम्य होता. पण याज्ञसेनी अग्निशिखेसारखी प्रखर होती.

तिचा पिता द्रुपद-त्याच्याकडे नित्य ऋषिमुनी, ब्रह्मवेत्ते येत. ते अनेक कथा सांगत. याज्ञसेनी बालवयापासूनच त्या कथा अगदी लक्षपूर्वक ऐकत असे, त्यामुळे ती बहुश्रुत बनली होती. प्रसंगी ती कथा सांगणारांशी वादविवाद करी, त्यांना निरुत्तर करणारे अनेक प्रश्न विचारी.

०००

स्वयंवरात अर्जुनाने 'पण' जिंकल्यावर ती पांडवकुलात आली.

अर्जुन तिला घेऊन आश्रमदारी आला तेव्हा धोरणी, दूरदृष्टी असलेल्या, क्षात्रधर्मात नित्य सजग असलेल्या माता कुंतीने म्हटले,

''जे आणलंयत ते आता पाच जणांनी वाटून घ्या.''

पाच पुत्रांची जूट एकत्र राहावी, त्यांच्यात फूट पडू नये हे तिचे धोरण किती दूरदर्शी! किती अचूक!

सासूच्या बोलण्याचं इंगित, त्यातला गर्भितार्थ, चतुर धोरणी याज्ञसेनीने जाणला आणि पांडवकुलातलं आपलं कर्तव्य पार पाडायला ती सिद्ध झाली.

०००

श्रीकृष्ण पांडवांना भेटण्यासाठी वनात आला तेव्हा सत्यभामा मोठ्या कुतूहलाने द्रौपदीला भेटण्यासाठी त्याच्याबरोबर आली.

गप्पा मारता मारता तिने म्हटले,

''पांचाली, मी इथे आल्यापासून पाहते आहे, पाची पांडव तुझ्यावर अगदी प्रसन्न आहेत. या पाचजणात तू अधिक लाडकी कुणाची आहेस हे सांगणे कठीण आहे.

''अगं, एका कृष्णाला प्रसन्न ठेवणे मला जमत नाही. तू या पाच पतींना इतकं प्रसन्न कसं ठेवतेस? अगं, एखाद्या ऋषीमुनीने तुला काही मंत्र तर देऊन ठेवलेला नाही ना?''

याज्ञसेनीने हसून म्हटले, ''सखी सत्यभामे, अगं आपल्या पतीला प्रसन्न ठेवण्यासाठी तिऱ्हाइताने मंत्र द्यावा लागत नाही. मी माझ्या वागण्याचे तंत्र तुला सांगते ते ऐक.''

याज्ञसेनीने सांगितलेले वैवाहिक सुखाचे ते तंत्र आजही कालबाह्य झालेले नाही.

०००

पांडव द्यूतात हरले. त्यांनी द्रौपदीलाही पणाला लावली, तेव्हा तिच्या प्रगाढ बुद्धिमत्तेचा प्रत्यय आला.

हरल्यानंतर द्रौपदीला पणाला लावल्यानंतर दु:शासनाने तिला खेचून भरसभेत आणली.

तेव्हा या अग्निशिखेने द्रोणाचार्य, भीष्म यांना जो प्रश्न विचारून निरुत्तर केलं तो प्रसंग!

मी सूतपुत्राला वरणार नाही; म्हणून तिच्या स्वयंवर मंडपात अपमानित झालेला कर्ण–ज्याने भरसभेत खेचून आणण्याची चिथावणी दिली; तो कर्ण म्हणाला,

''या पृथ्वीवर अनेक सुंदर स्त्रिया असल्याचे माझ्या कानी आले आहे. पण या द्रौपदीसारखी प्रगाढ बुद्धिमान स्त्री मात्र माझ्या ऐकिवात नाही.''

अशी ही याज्ञसेनी!

ooo

कौरवांनी भर सभेत तिला खेचून आणली. एका स्त्रीची–स्त्रीजातीची अवहेलना! विटंबना! तिच्या अब्रूवर घाला!

याचा परिणाम सूड! यातूनच महायुद्ध पेटले. न भूतो न भविष्यति असा क्षत्रियांचा संहार झाला. तो होणारच होता. अटळ होता. तेवढ्यासाठीच तर अग्निज्वालांतून ती निर्माण झाली होती. विधीने दिलेले कार्य तिने पार पाडले. एक युग–द्वापार युग संपले.

त्या याज्ञसेनीची ही कथा!

माझ्या 'सत्यप्रिय गांधारी'चं जसं माझ्या वाचकांनी स्वागत केलं, तसंच स्वागत या 'याज्ञसेनी'चेही होईल अशी आशा आहे.

**– डॉ. सुमती क्षेत्रमाडे**

# भाग पहिला